**प्रेसनोट दि. १६.०९.२०२२**

लोकसेवक सुनिल बाबुराव जावीर, तलाठी कापुसखेड, ता वाळवा, रा. मिरजवाडी, ता. वाळवा, जि. सांगली यांचेवर १५०००/- रुपये लाचेची मागणी करुन लाच रक्कम स्विकारलेने त्यांचेवर सांगली लाचलुचपत प्रतिबंधक विभागाची कारवाई.

---

तक्रारदार यांची आई वारस असलेली बागायत शेत जमीन इतर वारसानी तक्रारदार यांचे आईस विना मोबदला सह दुय्यम निबंधक वाळवा यांचे कार्यालयात कायम व खुष खरेदीपत्राने स्वखुशीने लिहुन दिलेली आहे. सदर जमीनीचे खुष खरेदीपत्राचा ऑनलाईन फेरफार तलाठी कापुसखेड यांचे लॉगीनला गेला होता. तक्रारदार यांनी त्यांचे नोंदीचे काम झाले काय याबाबत कापुसखेड गांवचे तलाठी सुनिल जावीर यांचेकडे चौकशी केली असता. तलाठी जावीर यांनी तक्रारदार यांचे आईचे नांवाने झालेल्या कायम व खुषखरेदी पत्राची सात बारा उताऱ्यावर नोंद धरणे करीता तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रुपये व तक्रारदार यांचे नातेवाईकांचे तलाठी सुनिल जावीर यांचेकडे असलेल्या कामाचे १५,०००/- रुपये असे दोघांचे दोन कामाचे ३०,०००/- रुपये लाचेची मागणी केली असल्याबाबत तक्रारदार यांनी दि.१४.०९.२०२२ रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो सांगली कार्यालयात दिला होता.

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक १५.०९.२०२२ रोजी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे पडताळणी केली असता त्यामध्ये लोकसेवक श्री. सुनिल जावीर, तलाठी कापुसखेड यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे व त्यांचे नातेवाईकांचे असे दोघांचे मिळुन ३०,०००/- रूपये लाच मागणी करून तक्रारदार यांचे नातेवाईक हे बाहेरगांवी असल्यामुळे तक्रारदार यांचे आईचे नांवच्या कायम खुष खरेदीपत्राची अधिकार अभिलेखात नोंद धरणे करीता १५,०००/- रुपये लाच मागणी करुन १५,०००/- रुपये लाच रक्कम आणुन देण्यास सांगीतल्याचे निष्पन्न झाले.

त्यानंतर दि.१६.०९.२०२२ रोजी तलाठी कार्यालय कापुसखेड या ठिकाणी सापळा लावला असता लोकसेवक श्री. सुनिल जावीर, तलाठी कापुसखेड यांनी तक्रारदार यांचेकडे १५,०००/- रुपये लाच मागणी करुन तलाठी कार्यालयाचे बाहेर असलेल्या त्यांच्या अल्टो कारमध्ये ठेवण्यास सांगीतली. त्यानंतर तक्रारदार यांनी तलाठी सुनिल जावीर यांचे सांगणे प्रमाणे १५,०००/- रुपये लाच रक्कम जावीर यांचे अल्टो कारमध्ये ठेवल्यानंतर लोकसेवक सुनिल जावीर तलाठी कापुसखेड पळून गेले आहेत. तलाठी जावीर यांचे वाहन ताब्यात घेतले असुन तलाठी सुनिल जावीर यांचा शोध सुरु आहे.

त्या अनुषंगाने श्री. सुनिल बाबुराव जावीर, तलाठी कापुसखेड, ता वाळवा, रा. मिरजवाडी, ता. वाळवा, जि. सांगली वर्ग ३ यांचे विरुध्द इस्लामपुर पोलीस स्टेशन येथे लाचलुचपत प्रतिबंधक अधिनियमाखाली गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदरची कारवाई मा. श्री. राजेश बनसोडे सो पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक, श्री. सुरज गुरव सो, अपर पोलीस उप आयुक्त/अपर पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सुजय घाटगे, पोलीस उप अधीक्षक, श्री. विनायक भिलारे, पोलीस निरीक्षक, श्री. दत्तात्रय पुजारी, पोलीस निरीक्षक, पोलीस अंमलदार सलीम मकानदार, अविनाश सागर, धनंजय खाडे, रविंद्र धुमाळ, संजय कलकुटगी, राधिका माने, सिमा माने चालक बाळासाहेब पवार यांनी केली आहे.

नागरिकांना आवाहन करण्यात येते की, लाच मागणी संबंधाने तक्रारी असल्यास पोलीस उप अधिक्षक, लाच लुचपत प्रतिबंधक, विभाग, बदाम चौक, सांगली. येथे अथवा कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक ०२३३/२३७३०९५ वर तसेच हेल्प लाईन क्रमांक १०६४ वर तसेच व्हॉट्स अॅप नंबर ७८७५३३३३३३ व मोबाईल नंबर ८९७५६५१२६२ तसेच खालील संकेतस्थळावर संपर्क साधावा.

संपर्क :-

१) मोबाईल अॅप - www.acbmaharashtra.net

२) फेसबुक पेज - www.facebook.com-maharashtraACB

३) वेबसाईट — www.acbmaharashtra.gov.in

पोलीस उप अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, सांगली
सत्यमेव जयते

(सुजय घाटगे)
पोलीस उप अधीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, सांगली